प्रेसनोट

# दहशतवादी हल्या सुरक्षेच्या दरम्यान घातपात विरोधी तपासणी

जा.क्र. ४२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०१/०६/२०१७

भंडारा:– दिनांक ३०/०५/२०१७ ला मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु यांच्या मार्गदर्शनात दहशतवादी संघटनाचे वतीने भारतात कुठेही दहशतवाही हल्ला होण्याची शक्यता असल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन सदर घातपात विरोधी तपासणी करण्यात आली त्यादरम्यान मर्मस्थळे, १) ऑर्डन्स फॅक्टरी जवाहरनगर २) ऑर्डन्स फॅक्टरी वॉटर वर्क्स कोंरभी ३) इंदीरा सागर गोसे धरण पवनी ४) बावनथळी प्रकल्प ५) जिल्हा पोलीस वायरलेस ऑटो रिपीटर भिलेवाडा यांना उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच घातपात विरोधी पथक (बी. डी. डी. एस) व ठाणेदारांच्या मार्फतीने भेटी देवुन चेक केले आहे. व संबधीतांना सतर्कते बाबत सुचना दिल्या आहे. तसेच संशयीत इसमाच्या हालचाली बाबत जिल्हातील गोपनीय यंत्रणा सक्रीय करण्यात आली असुन गोपनीय बातमीदार, पोलीस पाटील, ग्राम सुरक्षादल, पोलीस मित्र यांना सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्हातील सर्व मंदीर, मज्जीद, हॉटेल, लॉजेस, धाबे, गर्दीचे ठिकाण, बस स्थानक, रेल्वे स्थानक यांना चेक करण्याबाबत, जिल्हयातील सराईत गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याबाबत सर्व संबधीतांना सुचना देण्यात आले आहेत.

जिल्हातील प्रमख शहर भंडारा येथे मुख्य बस स्थानकावर दिनांक ३०/०५/२०१७ चे १९.५० वा. चे दरम्यान संशयीत बॅग आढळुन आल्याबाबत मॉप ड्रील घेण्यात आलेली आहे. तसेच बिट पेट्रोलींग कर्तव्यावरील सर्व कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त पेट्रोलींग करण्याबाबत तसेच रुग्णालय सज्जतेबाबत सुचना देण्यात आली आहे.

सदर घातपात विरोधी तपासणी दरम्यान अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा, पोनी. बी. आर. गाडे वानीशा भंडारा, पोनी. सिडाम जिवीशा शाखा भंडारा, ठाणेदार भंडारा, बी.डी.डी.एस पथक, दामीनी पथक, दहशत विरोधी पथक, क्युआरटी, आरसीपी यांच्या उपस्थितीत घातपात विरोधी पथकाकडुन यंत्राच्या साहाय्याने बॉम्ब शोधनारा श्वान टायसनचे मदतीने तपासणी करण्यात आली.

01.6

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.